# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO:९००१:२०१५) (IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्र निकेतन इमारत, चौथा मजला,
४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

दूरध्वनी क्र. ०२२-२६४७१२५५/ २६४७०९१६ फॅक्स क्र :०२२-२६४७३९८०
Email: director@msbte.com Web : www.msbte.org.in


जा. क्र.मरातंशिमं/का-१०/परिपत्रक/२०२०/ दिनांक -२७/०३/२०२०

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
सर्व संलग्नीत संस्था/तसेच स्वायत्त संस्था.

**विषय : Social distancing साध्य करुन करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखणे तसेच शैक्षणिक कार्य व परीक्षांबाबत.**

**संदर्भ.** : १) मंडळाची दि. १६/०३/२०२० ची दोन महत्त्वाची परीपत्रके
२) तंत्रसिक्षण संचालनायाचे दि. २३/०३/२०२० चे पत्र.
३) महाराष्ट्र शासनाची कोव्हीड-१९ संदर्भातील दि. २५/०३/२०२० ची लॉकडाऊन बाबतची अधिसूचना.

महाराष्ट्र शासनाने करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना मंडळाने संदर्भ क्र. १ मधील नमूद परिपत्रान्वये सर्व संलग्नीत संस्था तसेच स्वायत्त संस्थांना कळविलेल्या आहेत. तंत्रशिक्षण संचालनालयाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये मा. सचिव, मनुष्य बळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि.२१/०३/२०२० च्या पत्रान्वये **Social distancing** साध्य करुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना घरुन करावयाच्या कामाबाबत सुचित केलेले आहे. संदर्भ क्र. ३ अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हीड-१९ संदर्भातील लॉकडाऊन बाबत निर्देश जारी केलेले असुन त्यानुसार १४ एप्रिल २०२० पर्यंत संस्थांमधील शैक्षणिक कार्य बंद असणारआहे.

संस्थांमधील शैक्षणिक कार्य बंद असण्याच्या कार्यकाळात विद्यार्थी व शिक्षक यांचा प्रत्यक्ष संपर्क न येता इतर माध्यमातून संपर्क/समन्वय असणे अत्यावश्यक आहे. त्याकरीता वेगवेगळे Online platform/online lectures/learning manual इत्यादी उपलब्ध असून त्याचा शिक्षकांनी सुयोग्य वापर करणे गरजेचे आहे. याबाबत मंडळानेसुध्दा द्वितीय सत्रातील विद्यार्थ्यांकरीता Applied Mathematics व Applied Mechanics या विषयांचे Video Lectures उपलब्ध करुन दिलेले आहेत. तसेच Emerging Trend, Management या विषयांचे learning manual सुध्दा मंडळाने उपलब्ध करुन दिलेले आहेत.

उपरोक्त पार्श्वभूमीवर आपणांस कळविण्यात येते की, संस्था स्तरावरील विषयनिहाय उर्वरीत शैक्षणिक कार्याचा संबंधीत शिक्षकांनी आढावा घेऊन Online platform/online lectures/learning manual इत्यादीचा वापर करुन विद्यार्थ्यांना उपयुक्त विषयांशी संबंधीत मटेरीअल किंवा मॅन्युअल Whats App मार्फत किंवा संस्थेच्या website वरुन सुचविण्यात यावे, जेणेकरुन विद्यार्थी शैक्षणिक बाबींमध्ये/अभ्यासामध्ये गुंतून (Involve) राहील व शैक्षणिक कार्य पूर्ण होण्यास मदतीचे होईल.

मंडळाने संदर्भ क्र. १ अन्वये मंडळामार्फत आयोजीत केल्या जाणा-या चाचणी परीक्षा/प्रात्यक्षिक परीक्षा व सैधातीक परीक्षा बाबत निर्णय नंतर कळविण्यात येईल असे नमूद केलेले होते. त्याअनुषंगाने असेही स्पष्ट करण्यात येते की, सर्व शैक्षणिक संस्था पुर्वरत कार्यान्वीत झाल्यानंतर मंडळामार्फत आयोजीत परीक्षाबाबतचे सुधारीत वेळापत्रक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.msbte.org.in) जारी करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक
म. रा. तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१.

प्रत माहिती करीता सादर
१) मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता
उपसचिव, म. रा. तं.शि.मं., विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.